# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३०६ - २३** **दिनांक : - ०९/०९/२०२३**

## परराज्यातील दोन ईसमांकडुन एक देशी बनावटीचे रिव्हॉल्वर व २ जिवंत काडतुसे जप्त
## वालीव पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटिकरण पथकाची कामगीरी.

तुंगारफाटा परीसरामध्ये दोन इसम हे देशी बनावटीचे अग्नीशस्त्र खरेदी - विक्रीकरीता येणार असल्याची माहीती गुप्त बातमीदाराकडुन वालीव पोलीसांना प्राप्त झाली होती. सदर मिळालेल्या माहीतीच्या सत्यतेबाबत शहानिशा करुन पुढील कायदेशिर कारवाई करण्याबाबत वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे यांनी गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप व पथकास आदेश दिले होते. त्यानुसार स.पो.नि. सानप व गुन्हे प्रकटीकरण पथकाने आरोपी नामे १) सत्यप्रकाश रामबच्चन यादव, वय २४ वर्षे, रा.ठि. ग्राम- तिवारीपुर, पो. मेहनाजपुर, ता. लालगंज, जि. आजमगढ, राज्य- उत्तर प्रदेश व २) धिरेंद्र लोदई पाल, वय २८ वर्षे, रा.ठि. ग्राम- कुबाखार, पो. कुबाखार, तहसिल- लालगंज, जि. आजमगढ, राज्य- उत्तर प्रदेश या ईसमांना एक देशी बनावटीचे रिव्हॉल्वर, २ जिवंत काडतुसे व इतर वस्तु असा एकुण ७२,१२०/- रुपये किमतीच्या मुद्देमालासह यशस्वीरित्या सापळा रचुन ताब्यात घेतले. तसेच नमुद दोन्ही आरोपीतांनी मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे कडील मनाई आदेशाचा भंग केला म्हणुन आरोपीतांच्या विरुध्द वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७४८/२०२३ कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७(१)(३),१३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील कामगीरी श्रीमती पोंणिमा श्रींगी – चौगुले, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयरात रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सैय्यद जिलानी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.ह. मुकेश पवार, किरण म्हात्रे, मनोज मोरे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.शि. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या केली आहे.